नि.फौ.प्र.क्र.१६/२०२४
सरकार -वि.- जगन नारखेडे+१३
**निशाणी क्र.३९४**

**सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक २३ याची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नांव - रविंद्र सोमाजी राणे,

वय - ६२ वर्षे, व्यवसाय – शेती,

रा. - म्हैसवाडी, ता. मलकापुर जि. बुलढाणा.

**सरतपास- सरकारी अभियोक्ता श्री.आर.बी. देवराज यांचेमार्फत शपथेवर सुरु....**

०१. माझी शेती म्हैसवाडी शिवारात असून ती चार एकर आहे. माझ्या शेताचा गट क्र. २०० आहे. सन २०२२-२३ मध्ये मी कापसाचे उत्पन्न घेतले होते. त्यावेळी माझ्या शेतात १८ क्वींटल ९२ किलो कापूस झाला होता. तो कापूस मी रमेश भागवत पाटील यास विकला होता. त्या कापसाचा भाव ९ हजार प्रति क्वींटल ठरला होता. तो कापूस दि.२३.०७.२०२३ रोजी नेला होता. तो करार ४० दिवसाप्रमाणे ठरला होता. आरोपी रमेश लाहुडकर हा पैसे ४० दिवसात परत करणार होता. त्याने मला ७५ हजार रूपये २० दिवसात दिले परंतु उर्वरित ७५ हजार बाकी आहेत ते दिले नाही. मी रमेश पाटील याला आधी पासून ओळखत होतो. तो चिचोलचा राहणारा आहे. पोलीसांनी माझा जबाब घेतला होता. मी सातबारा पोलीसांना दिला होता. मी रमेश पाटील याला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास- आरोपी क्र.१,४,११ व १२ तर्फे विधीज्ञ श्री.एन.सी.जाधव यांचेमार्फत सुरु.**

०२. मी पोलीसांना कधी जबाब दिला होता त्याची तारिख मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी असा कुठलाही कापूस दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांना खोटा जबाब दिला व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास काही नाही.

**उलटतपास- आरोपी क्र.२ व ३ तर्फे विधीज्ञ श्री.तांदुळकर यांचेमार्फत सुरु....**

०३. आरोपी क्र.१,४,११ व १२ तर्फे घेण्यात आलेला उलटतपासत स्वीकृत

करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.५ तर्फे विधीज्ञ श्री. ए.सी. एदलाबादकर यांचेमार्फत सुरु....</u>**

०४. आरोपी क्र.१,४,११ व १२ तर्फे घेण्यात आलेला उलटतपासत स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.६,७, ९ व १४ तर्फे विधीज्ञ श्री.जी.डी.पाटील यांचे मार्फत सुरु....</u>**

०५. आरोपी क्र.१,४,११ व १२ तर्फे घेण्यात आलेला उलटतपासत स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.८ तर्फे विधीज्ञ श्री.एन.एस.तायडे यांचेमार्फत सुरु....</u>**

०६. आरोपी क्र.१,४,११ व १२ तर्फे घेण्यात आलेला उलटतपासत स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१० तर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.मोरे यांचेमार्फत सुरु....</u>**

०७. आम्ही पेरण्याची सुरूवात १५ मे पासून करतो. कापूस ऑगस्ट ते सप्टेंबर या महिन्यात येतो. कराराबाबत कोणतीही लिखापडी झाली नव्हती. कापूस मोजल्याबाबत पट्टी वगैरे माझ्याकडे नाही तसेच मी पोलीसांना ती तपासाकामी दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, कापूस निघाल्यानंतर शेतकरी लोक बाजार समीतीमध्ये आणून विकतात. हे म्हणणे खरे आहे की, तेथे कापूस मोजल्याबाबत टोकन व पावती मिळते. हे म्हणणे खरे आहे की, मी असे काहीही केलेले नाही. मला पैसे मिळाल्याबाबत काहीही लेखी केलेले नाही तसेच किती बाकी राहीले याबाबत देखील काहीही लेखी केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या नावाने शेतीही नाही. हे म्हणणे खरे नाही की, सातव्या महिन्यात माझ्याकडे कोणताही कापूस नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, अनेक तक्रारी दाखल झाल्यामुळे मी त्यात माझा फायदा करण्याकरिता माझी खोटी तक्रार घेवून गेलो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी रमेश पाटील व माझी कोणतीही ओळखत नसून मी कधी त्याला कोणताही कापूस दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास काही नाही.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१३ तर्फे विधीज्ञ श्री.बी.एस.वानखेडे यांचेमार्फत सुरु....</u>**

०८.		आरोपी क्र.१,४,११ व १२ तर्फे घेण्यात आलेला उलटतपासत स्वीकृत करण्यात आला.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2026.04.15 17:06:56 +0530

दिनांक : १५/०४/२०२६.

**( पी.एस.ठाकरे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.१), मलकापूर